Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# महात्मा जोतीराव फुले यांचे साहित्य

डॉ. संतोष जगन्नाथ जाधव
मराठी विभाग,
श्री.आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रं.

प्रस्तावना

१९ व्या शतकातील अनेक चळवळींचा आणि प्रवाहांचा प्रारंभबिंदू म्हणून महात्मा फुले यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी आपल्या लेखनातून व कार्यातून प्रारंभ केलेल्या अनेक बाबी पुढील काळात समाजाचे चिंतनाचे विषय राहिलेले आहेत. १८४८ मध्ये मुलींसाठी व पुढे अस्पृश्यांसाठी काढलेल्या शाळा हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. भारतातील सामान्य आणि शोषित माणूस हा त्यांचा चिंतनाचा विषय राहिलेला आहे. जे जे बुद्धीला पटेल आणि सामान्य माणसांच्या मुक्तीसाठी आवश्यक वाटेल ते ते त्यांनी निर्भयपणे केले. अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरातील विहीर खुली करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्वतःच्या घरात स्थापना करणे, हंटर कमिशन पुढे सर्वांसाठी शिक्षण मोफत करा अशी साक्ष देणे ही त्यातील काही उदाहरणे आहेत. महात्मा फुले ज्यांच्यासाठी लिहीत होते त्यांचीच भाषा त्यांनी साहित्यात. त्यामुळे तत्कालीन उच्चवर्णीय लेखकांच्या दृष्टीने त्यांचे लेखन उपहासाचा आणि कुचेष्टेचा विषय झाले असणे अगदी स्वाभाविक आहे. अलंकारिक पांडित्यपूर्ण लिहिण्याची प्रथा ज्या काळात होती; त्या काळात बोली भाषेचा वापर लेखनासाठी करावा हे धाडस फुले यांनी पहिल्यांदा केले. प्रत्यक्ष कार्य आणि विस्तृत वाचन यामधून महात्मा फुलेंचे व्यक्तिमत्व घडत गेले. थॉमस पेन यांच्या ग्रंथाचे वाचन आणि भोवतीच्या समाजात येणारा अनुभव यामुळे फुले अंतर्मुख होऊ लागले आणि एकूणच परंपराकडे व धर्मस्थितीकडे ते शोधकपणे पाहू लागले. त्यांच्या जडणघडणीविषयी सदानंद मोरे म्हणतात की, "वारकरी परंपरा व तुकाराम आणि कबीर हे दोन महत्त्वाचे घटक लक्षात घेतल्याशिवाय महात्मा फुले यांचे व्यक्तिमत्व कळणारच नाही."१ प्रारंभी शैक्षणिक आणि इतर कार्य करणारे महात्मा फुले १८५५ नंतर लेखनाकडे वळलेले दिसतात. १८५५ साली त्यांनी तृतीयरत्न हे नाटक लिहिले. पुढे पोवाडे, अखंड, निबंध यांचे लेखन केले.

महात्मा फुलेंचे साहित्य प्रामुख्याने समाजप्रबोधनपर असून त्यात त्यांनी जातीय व्यवस्था, अंधश्रद्धा, अज्ञान आणि ब्राह्मणशाहीच्या शोषणाविरोधात ठाम भूमिका घेतली. "गुलामगिरी", "तृतीय रत्न", "ब्राह्मणांचे कसब", "शेतकऱ्याचा असूड", आणि "छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा" ही त्यांची महत्त्वाची साहित्यनिर्मिती आहे. गुलामगिरी या ग्रंथात त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील शोषणाचे स्वरूप स्पष्ट करून, त्यास ऐतिहासिक संदर्भ दिले. शेतकऱ्याचा असूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीवर भाष्य केले आहे.त्यांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेद्वारे समाजसुधारणेची चळवळ पुढे नेली. शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया आणि मागासवर्गीय यांना सामाजिक न्याय मिळावा, यासाठी त्यांनी लेखन केले. त्यांच्या साहित्याची भाषा सोपी, प्रभावी आणि सर्वसामान्यांना समजेल अशी आहे.

डॉ.प्रल्हाद लुलेकर म्हणतात,"समाजातील शोषितांचे जीवन सर्वार्थाने बदलले पाहिजे. त्यासाठी त्यांचे शोषण थांबले पाहिजे. म्हणून महात्मा जोतीराव फुले यांनी आयुष्यभर कष्ट उपसले. त्यांचे विचार महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला नवी दिशा देणारे ठरले. शोषण थांबवायचे तर शोषणकर्ते आणि शोषणमार्ग निश्चित शोधले जायला हवेत. शोषितांच्या जगण्या-मरण्याच्या संघर्षाचे ते साक्षीदार होते. त्यामुळे त्यांनी गंभीरपणे शोषणासंबंधी धर्मचिकित्सा केली. त्यातून काही निष्कर्षाप्रत ते पोहोचले."२ आजही महात्मा फुलेंचे साहित्य सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या प्रत्येकासाठी मार्गदर्शक ठरते. त्यांनी मांडलेल्या विचारधारा आजच्या काळातही तितक्याच महत्त्वाच्या असून, त्यांच्या साहित्याचा अभ्यास सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच, त्यांच्या साहित्यावर संशोधन करणे हे फक्त ऐतिहासिक दृष्टिकोनातून नव्हे, तर वर्तमान सामाजिक स्थितीच्या अनुषंगानेही महत्त्वाचे आहे.

"तृतीय रत्न" महात्मा जोतिराव फुले यांनी १८५५ मध्ये लिहिलेले "तृतीय रत्न" हे मराठीतील पहिले सामाजिक नाटक मानले जाते. या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व आणि ब्राह्मणशाहीच्या शोषणकारी वृत्तीवर कठोर प्रहार केला.या नाटकातील प्रमुख पात्रे ही समाजातील शूद्र-अतिशूद्र आणि ब्राह्मणवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी आहेत. ब्राह्मणांनी शिक्षणावर लादलेल्या बंधनांमुळे शूद्र-अतिशूद्र वर्ग अज्ञानात ठेवला जातो, यावर फुले यांनी तीव्र टीका केली आहे. नाटकातील "गुरुजी", जो ब्राह्मण आहे, तो दलित समाजाला अडाणी ठेवण्याचा प्रयत्न करतो, तर "शूद्र पात्र", शिक्षण घेतल्यानंतर आपले जीवन बदलू शकतो, हे दाखवले आहे."तृतीय रत्न" या नाटकातून फुले यांनी स्त्री-शिक्षण आणि शूद्र शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, पुरोहितशाहीने निर्माण केलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड आणि शिक्षणावरील एकाधिकाराला त्यांनी विरोध दर्शवला. या नाटकामधून सामान्य माळ्या-कुणब्यांचे शोषण धर्ममिषाने कसे केले जाते याचे दर्शन घडविण्यात आलेले आहे. शेतकऱ्याची बायको गरोदर राहिली की, जोशी तेथे जाऊन तिला ग्रह नक्षत्रांची भीती घालतो आणि काही धन उपटतो असा या नाटकाचा प्रारंभ आहे. पुढे शेतकऱ्याची पत्नी घाबरते, आपल्या नवऱ्याला सांगते व नवराही पुरोहित सांगेल त्याप्रमाणे कर्ज काढून ब्राह्मण भोजनादि धार्मिक विधी करीत राहतो. हे नाटक घडत असताना शेतकरी कुटुंबाचे अज्ञान, कर्जबाजारीपणा आणि धर्माच्या शोषक रूपाचे दर्शन घडत जाते. विशेष म्हणजे समाजाच्या या दोन स्तरांवर वापरण्यात येणाऱ्या भाषेचे वेगळेपण म. फुले यांनी लक्षात घेतले आहे. नाटकाच्या उत्तरार्धात एक मुस्लीम मनुष्य व एक ख्रिस्ती पाद्री येतो. मुस्लीम मनुष्य शांतपणे या सर्व व्यवहारांकडे पाहतो आहे आणि ख्रिस्ती पाद्री मात्र शेतकऱ्यांना शिक्षण नसल्यामुळेच त्यांची फसवणूक होते आहे, धर्माचे विपरित रूप त्यांना सांगितले जात आहे असे सांगतो. शिक्षण नसल्यामुळेच शुद्रातिशूद्रांचे शोषण होत आहे हे म. फुले यांनी अनेक ठिकाणी लिहिले आहे. "विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली! गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले." हे सूत्रबद्ध विवेचन त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोण प्रकट करतो. हंटर आयोगापुढे साक्ष देताना बहुजनांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे कसे गरजेचे आहे हेही त्यांनी सांगितले आहे. याचा अर्थ असा की शिक्षण-विशेषतः बहुजनांचे शिक्षण ही गोष्ट त्यांच्या चिंतनविश्वातील प्रधान बाब आहे आणि त्याचा प्रारंभ 'तृतीय रत्न' पासूनच दिसू लागतो.

गुलामगिरी (१८७३):- हा ग्रंथ भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय शोषणावर परखड भाष्य करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. हा ग्रंथ तत्कालीन समाजातील ब्राह्मणशाहीच्या वर्चस्ववादी मानसिकतेला आव्हान देतो आणि शूद्र-अतिशूद्र यांच्यावर झालेल्या अन्यायाचा पर्दाफाश करतो. फुले यांनी गुलामगिरीत ऐतिहासिक दृष्टिकोन स्वीकारून आर्यांचे भारतातील आक्रमण आणि स्थानिक बहुजन समाजाच्या शोषणाचा शोध घेतला आहे. त्यांनी ब्राह्मणी धर्मग्रंथांतील पुरोहितशाहीने निर्माण केलेल्या गुलामगिरीच्या संकल्पना उघड केल्या आणि समानतेच्या विचाराचा पुरस्कार केला. त्यांनी तत्कालीन समाजातील वर्णव्यवस्थेचा तीव्र विरोध केला आणि ब्रिटिश राजवटीच्या तुलनेत ब्राह्मणशाही अधिक शोषणकारी असल्याचे प्रतिपादन केले. तसेच, सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण आणि संघटन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. गुलामगिरी हा ग्रंथ सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाच्या चळवळीला प्रेरणा देणारा असून, आजही तो समाजशास्त्रीय अभ्यासकांसाठी महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरतो.

ब्राह्मणांचे कसब:- महात्मा फुले यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय अन्याय, ब्राह्मणशाहीचे वर्चस्व आणि सामाजिक विषमतेवर कठोर टीका करणारे अनेक ग्रंथ लिहिले. त्यापैकी हा ग्रंथ तत्कालीन धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेचे आणि ब्राह्मणांच्या शोषणकारी तंत्रांचे सत्य उघड करणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. हा ग्रंथ प्रामुख्याने ब्राह्मण पुरोहितांनी समाजावर लादलेल्या रूढी, कर्मकांड आणि अंधश्रद्धांचा भांडाफोड करतो. फुले यांनी यात ब्राह्मण वर्गाने स्वतःच्या हितसंबंधांसाठी तयार केलेल्या सामाजिक आणि धार्मिक संकल्पनांचे विश्लेषण केले आहे. ते स्पष्ट करतात की, ब्राह्मणांनी निर्माण केलेली कर्मकांडप्रधान व्यवस्था ही शूद्र-अतिशूद्रांना मानसिक व आर्थिकदृष्ट्या गुलाम बनवण्यासाठीच होती. ते सांगतात की, शिक्षणाचा आणि ज्ञानाचा अधिकार सर्वांना असावा, परंतु ब्राह्मणशाहीने तो फक्त स्वतःपुरता मर्यादित ठेवला. फुले यांच्या या ग्रंथाने सत्यशोधक चळवळीला बळ दिले. त्यांनी जातीय

विषमतेला विरोध करत समाजात समतेचा विचार रुजवण्यासाठी हा ग्रंथ लिहिला. आजही तो सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असून, दलित-बहुजन चळवळींना प्रेरणा देणारा आहे.

शेतकऱ्याचा आसूड:- (१८८१) हा ग्रंथ ब्रिटिश राजवटीत भारतीय शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीचे वास्तव दर्शवणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे. फुले यांनी या ग्रंथाद्वारे तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेचा कठोर समाचार घेतला आहे. हा ग्रंथ पद्य आणि गद्य अशा दोन्ही शैलींमध्ये लिहिला गेला असून, तो शेतकऱ्यांच्या दैनंदिन दुःखांची जाणीव करून देतो. फुले यांनी यात ब्राह्मणी समाजव्यवस्थेने शेतकऱ्यांचे मानसिक आणि आर्थिक शोषण कसे केले, याचे सखोल विश्लेषण केले आहे. त्यांनी शेतकऱ्याच्या हलाखीच्या स्थितीला जबाबदार असलेल्या धर्मगुरू, जमीनदार आणि ब्रिटिश प्रशासनावर कठोर टीका केली.

या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांची दुर्दशा स्पष्ट करताना त्यांच्या अज्ञान, अंधश्रद्धा आणि शिक्षणाच्या अभावालाही कारणीभूत ठरवले आहे. त्यांनी समाजाला प्रश्न विचारण्याची आणि शिक्षणाच्या माध्यमातून आपली परिस्थिती सुधारण्याची गरज अधोरेखित केली. या ग्रंथात शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या धर्मव्यवस्थेचा आणि ब्रिटिश सरकारच्या भूमिकेचा समाचार घेताना फुले यांनी "कष्ट करणारेच खरे शेतकरी असून, समाजातील खराखुरा आधारस्तंभ तेच आहेत", असा महत्त्वाचा विचार मांडला. हा ग्रंथ केवळ ऐतिहासिक दस्तऐवज नसून, आजही तो कृषी आणि सामाजिक विषमतेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा आहे. तो सामाजिक न्याय, शोषणमुक्ती आणि परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी ठरतो.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा :-(१८६९) हा पोवाडा केवळ ऐतिहासिक स्तुतीपर लेखन नसून, त्यातून फुले यांनी शिवरायांचे कार्य, सामाजिक समतेचा विचार आणि शूद्र-अतिशूद्र समाजासाठी त्यांनी केलेले योगदान यावर प्रकाश टाकला आहे. या पोवाड्यात फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ योद्धा किंवा हिंदू राजे म्हणून नव्हे, तर संपूर्ण बहुजन समाजाचे रक्षण करणारे लोकनेते म्हणून गौरवले आहे. त्यांनी शिवाजी महाराजांना शूद्रांचे तारणहार मानले आणि त्यांच्या कार्याची तुलना अन्य राजांशी करून ते समाजहितैषी कसे होते, हे स्पष्ट केले. फुले यांच्या या पोवाड्यात दोन महत्त्वाचे पैलू दिसून येतात. एक म्हणजे शिवाजी महाराजांचे गुणगान, तर दुसरे म्हणजे ब्राह्मणशाहीवर केलेली टीका. तत्कालीन पुरोहितशाहीने शिवाजी महाराजांना योग्य तो मान दिला नाही, तर फक्त पेशव्यांना महान समजले, हा फुले यांचा महत्त्वाचा मुद्दा होता. फुले यांनी शिवाजी महाराजांचे कार्य लोकहितासाठी कसे होते आणि त्यांनी शोषितांसाठी कसे राजकारण केले, हे या पोवाड्यात स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा पोवाडा केवळ ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरत नाही, तर तो सामाजिक समतेच्या विचारांची बीजे रोवणारा ठरतो.

सार्वजनिक सत्यधर्म :- (१८८९) हा ग्रंथ सामाजिक समता, विज्ञाननिष्ठा आणि सत्याच्या आधारे समाजव्यवस्थेचे पुनर्रचना करण्याचा विचार मांडतो. फुले यांनी या ग्रंथात पारंपरिक हिंदू धर्मव्यवस्थेतील जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि कर्मकांडांवर कठोर टीका केली आहे. फुले यांच्या मते, समाजातील बहुजन वर्ग हा धर्माच्या नावाखाली ब्राह्मणशाहीकडून शतकानुशतके शोषला गेला आहे. त्यामुळेच त्यांनी "सत्यधर्म" ही संकल्पना मांडली. या धर्मात समानता, विवेक आणि नैतिकता यांना महत्त्व दिले गेले आहे. त्यांनी असे मत मांडले की, देवाच्या नावाखाली शूद्र-अतिशूद्रांना शिक्षणापासून, संपत्तीपासून आणि अधिकारापासून वंचित ठेवणाऱ्या ब्राह्मणी धर्मव्यवस्थेचा त्याग करणे आवश्यक आहे. या ग्रंथातील महत्त्वाचे विचार १. जातिव्यवस्थेचा विरोध – फुले यांनी स्पष्ट केले की ब्राह्मणांनी स्वतःच्या फायद्यासाठी वर्णव्यवस्था निर्माण केली आणि इतर जातींना हीन ठरवले. २. विज्ञाननिष्ठा आणि शिक्षण – समाजातील प्रत्येकाने शिक्षण घेणे गरजेचे असून, अंधश्रद्धांवर विश्वास ठेवण्याऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारावा. ३.सामाजिक समता – सत्यधर्मात कोणताही भेदभाव नाही. सर्व माणसे समान आहेत आणि त्यांना समान अधिकार मिळाले पाहिजेत. ४.शेतकरी आणि कामगारांचे महत्त्व – समाजाच्या उन्नतीसाठी श्रमिकवर्गाला योग्य प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.

सार्वजनिक सत्यधर्म हा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा गाभा दर्शवणारा ग्रंथ आहे. तो केवळ धार्मिक सुधारणा करण्यासाठी नव्हे, तर सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी लिहिला गेला. आजही हा ग्रंथ समतेच्या लढ्यात प्रेरणादायी ठरतो.

अखंड :- ही म. फुले यांच्या काव्यरचनेतील महत्त्वाची निर्मिती आहे. या सगळ्याच काव्य निर्मितीतून म. फुले यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची स्वतंत्र दृष्टी प्रत्ययाला येते. त्यांची इतिहासाकडे, धर्माकडे, भोवतीच्या वास्तवाकडे पाहण्याची स्वतंत्र अन्वेषण दृष्टी काव्यातूनही प्रत्ययाला येते. म्हणूनच म. फुले यांच्या पोवाड्यातील शिवाजी 'कुळवाडीभूषण' असतो, गागाभट्ट विपुल धन घेऊनच राज्याभिषेक करतो किंवा जिजाऊ त्याला जो इतिहास सांगते तो संस्कृती संघर्षाचा असतो ! एकीकडे प्रस्थापित धर्म आणि समाजव्यवस्था म. फुले नाकारतात, तर दुसरीकडे श्रेष्ठतर जीवनमूल्यांचा ते स्वीकार करतात. सत्य, न्याय, माणुसकी, स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारख्या उदारमतवादी मूल्यांवर म. फुले यांची नितांत निष्ठा आहे आणि ती त्यांनी लिहिलेल्या अखंडांमधून प्रत्ययकारी होऊन येते. संत वाङ्मयाशी विशेषतः संत तुकारामांशी नाते सांगणाऱ्या या अखंडांची रचनाही लक्षणीय आहे. अल्पाक्षरत्वामधून अर्थपूर्ण सांगण्याची, क्वचित, तत्त्वचिंतनाच्या पातळीवर जाण्याची एक विलक्षण हातोटी म. फुले यांना साधली आहे. ही रचना अभंग सदृष्य असली तरी पारलौकिकासंबंधी चिंतन करणारी असणे शक्यच नाही. ती मानवमुक्ती, श्रेष्ठतर जीवनमूल्ये यांचा ध्यास घेणारी आणि त्यांचे स्वरूप सांगणारी अशी आहे. एकंदरीत जनसामान्यांचा उद्धार हीच अखंडांची प्रेरणा आहे. निसर्गामध्येच समतेची भावना असल्याने माणसामाणसांमध्ये भेद असणे म. फुले यांना मान्य नाही. धर्म राज्य यासारख्या गोष्टीही त्यांना निरर्थक वाटतात -

"सर्वांचा निर्मिक आहे एक धनी। त्याचे भय मनी। धरा सर्व। ।१ ।।
न्यायाने वस्तूचा उपभोग घ्यावा। आनंद करावा । भांडू नये ।।२।।
धर्मराज्य भेद मानवा नसावे। सत्याने वर्तावे । इशासाठी ।।३।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो। आर्यास सांगतो । जोती म्हणे ।।४।।

किंवा

एक सूर्य सर्वा प्रकाशास देतो। उद्योगा लावितो प्राणीमात्रा ।।१।।
मानवासहित प्राण्यांचे जीवन। सर्वांचे पोषण । तोच करी।।२।।
सर्वा सुख देई जनकाच्या परी । नच घरी दुरी । कोणी एका ।।३।।
मानवाचा धर्म एकच असावा। सत्याने वर्तावा । जोती म्हणे ।।४।।

स्त्रीपुरुषांमध्ये भेद असू नये; ख्रिस्त, मुसलमान, मांग, महार असे धर्म अगर जातीभेद असू नयेत; सर्व मानवांनी नीतीने आचरण करावे, सृष्टी समृद्ध आहे तिचा उपभोग घेऊन समाधानाने रहावे, रंजल्या गांजलेल्यांचे दुःख दूर करावे, सद्विवेक सतत जागता ठेवावा.

सार्वजनिक सत्यधर्म :-

हे पुस्तक म्हणजे सत्यशोधकांचा आचारधर्मच होय. परंतु हा आचारधर्म कर्मकांडाच्या पातळीवरील नाही तर एकूण माणसाला सुखाकडे नेणारा, विचारशक्तीला प्राधान्य देणारा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रवर्ती स्थान देणारा असा आहे. पारलौकिक विश्व म. फुल्यांना मान्यच नाही. तेव्हा याच लौकिक जीवनाच्या सुखाचा शोध घेणार असा हा सत्य धर्म आहे. म्हणूनच या धर्मास 'इहवादी' हे विशेषण प्रा मे. पुं. रेगे यांनी लावले आहे. त्यांनी म्हटले आहे, "जोतिबांचा हा ज सत्यधर्म आहे त्याची काही वैशिष्ट्ये ध्यानात घेण्याजोगी आहेत. एकतर त्याच्या मागची प्रेरणा 'इहवादी' आहे. इहवादी या अर्थाने की, माणसाला ऐहिक जीवनात सुखी होता येते, निर्मिकाने जगाची आणि मानवी प्रकृतीची घडण अशी केली आहे की, माणूस योग्य रीतीने जगला तर त्याला आपले सुख साधता येते. हा सिद्धांत जसा जोतिबा स्वीकारतात त्याचप्रमाणे माणसाने आपले सुख साधण्याचा प्रयत्न करणे योग्य आहे, माणसाने आपले सुख साधावे ह्यासाठीच निर्मिकाने माणसांना आणि जगाला निर्माण केले आहे. हा सिद्धांतही जोतिबा स्वीकारतात."३ आपल्या लेखात डॉ. आ. ह. साळुंखे यांनीही हाच विचार मांडला आहे. मानवी लौकिक जीवन सुखी करणे हा म. फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचा हेतू असल्याचे ते

अधोरेखित करतात. ते म्हणतात, "त्यांच्या धर्माचे स्वरूप ईश्वरसापेक्ष, परंतु मानवाधिष्ठित आहे. माणसाला ईश्वराकडे घेऊन जाणाऱ्या त्यांच्या धर्माचा रस्ता इतर माणसांच्या हृदयातून जातो, असेही त्याचे वर्णन करता येईल. किंबहुना तो रस्ता हृदयापर्यंतच जातो आणि तेथे पोहोचणे हाच ईश्वराकडून झालेला मानवाचा औपचारिक नव्हे तर वास्तव अंगीकार होय, असेही म्हणता येईल."४

सत्यधर्माचे वेगळेपण लक्षात घेतले की, म. फुले तत्कालीन कुठल्याही समाजात का सहभागी झाले नाहीत ते लक्षात येते. तसेच हिंदू धर्मातील अनेक कल्पनाही त्यांना शोषण करणाऱ्या; अतएव ताज्य वाटत होत्या. मुस्लीम धर्माबद्दल, त्यांच्या राजांबद्दलही त्यांनी प्रतिकूलच लिहिले आहे. ख्रिस्ती धर्माचे स्वरूप त्यांना आकर्षित करू शकत नव्हते. त्यामुळेच त्या त्या काळात निर्माण झालेल्या धर्माला त्या त्या काळाच्या मर्यादा आहेत, तसेच त्या त्या धर्माच्या संस्थापकांनी आपल्या काळाशी तडजोडी केल्या असेही ते संगतात आणि म्हणूनच सर्व काळात आणि सर्वांना अनुसरता. येईल असा धर्म सांगणे त्यांना गरजेचे वाटलेले आहे. असा धर्म केवळ 'सत्या'च्या पायावरच उभा राहू शकेल अशी त्यांची श्रद्धा आहे. सत्य, नीतिमत्ता, स्त्री-पुरुष समानता, उच्च-निचता निषेध, सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्त व मानवी उन्नयनासाठी सहाय्यभूत होणारा धर्म त्यांना अपेक्षित आहे. प्रचलित हिंदू धर्मामध्ये ह्या गोष्टी सापडत नाहीत, उलट तो शोषणयंत्रणेला धर्मप्रामाण्य देऊन मदतच करतो असे त्यांना वाटते. त्यामुळे एकीकडे ते हिंदू धर्मातील तत्त्वे, जातीभेद, ग्रंथातील नको ते आदर्श प्रस्थापित करणाऱ्या व्यक्ती, पारंपरिक शोषक, धर्माचे समर्थन करणारे ग्रंथ आणि ग्रंथकार या सगळ्यांचे ते खंडन करतात, त्यातील मानवताविरोधी बाबींचे ते दर्शन घडवितात. तर दुसरीकडे ते त्यांना अभिप्रेत असणाऱ्या धर्मविचाराचे आणि नीतिमूल्यांचे प्रतिपादन करीत जातात. अशा प्रकारे म.फुले यांचा सत्यधर्म-विचार असा दुधारी आहे. तत्कालीन साहित्यविश्वाच्या आहारी न जाता, प्रचलित साहित्यविश्वाची भाषा न स्वीकारता ते स्वतंत्रपणे बोलीच्या खास लकबींसहीत भाषेचा वापर करू शकतात त्याचे कारणही सामान्य माणसांविषयी त्यांच्या मनात असलेल्या तळमळीमुळेच हे उघड आहे. सामान्य माणसांमध्ये जागृती निर्माण व्हावी या तीव्र हेतुमुळे त्यांची भाषा साधी, सोपी, प्रांजळ, तरीही कोणाचा मुलाहिजा न ठेवणारी फटकळ रूप धारण करते.

"परंतु सांप्रत लक्ष्मी आपल्या ज्ञान व वस्त्रहीन झालेल्या शेतकऱ्यांच्या घरात पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेना, तेव्हा कंटाळून उघड दिवसा आपल्या समुद्र पित्याच्या घरी गेली व समुद्राच्या पलीकडील तिच्या इंग्रज सख्या बांधवांनी तिच्या मर्जीप्रमाणे आळस टाकून उद्योगधंद्याचा पाठलाग करून, आपल्या घरातील अबालवद्ध स्त्री जातीस बरोबरीचा मान देऊन त्यांचा इतमाम नीट ठेवू लागल्यामुळे ती (लक्ष्मी) त्यांची बंदी बटीक झाल्यावरून, ते आपल्या हस्तगत झालेल्या शूद्र शेतकऱ्यांपासून मनमानेल तसे द्रव्य गोळा करून..... "५

म. फुले यांची भाषा किती अर्थपूर्ण होऊ शकते याचा प्रत्यय वरील उताऱ्यांवरून येईल. परंतु कधीकधी त्यांची भाषा, अंतःकरणाचा ठाव घेऊ शकते याची प्रतीती अनेकदा येते. शेतकऱ्याचा असूड मधील 'शेतकऱ्याची हल्लीची स्थिती' या प्रकरणामध्ये त्यांनी रेखाटलेले शेतकऱ्याच्या घराचे वर्णन वाचत असताना आपण एखाद्या तत्कालीन कादंबरीतील उतारा तर वाचत नाही ना असे वाटू लागते. याचा अर्थ एवढाच की भाषेचा समर्थ वापर म. फुले करू शकतात. परंतु ज्या वर्गासाठी ते लेखन करीत आहेत त्यांचे भान ते सतत बाळगतात. त्यांच्या भाषेचा गौरव करताना उपहास, उपरोध, नाट्यात्मकता आणि अंतरिक तळमळ या बाबींचा उल्लेख करून डॉ. स. गं. मालशे म्हणतात, "त्यामुळेच त्यांच्या गद्य वाङ्मयात प्रस्थापित भुईला तडे पडून तिच्या मुशीतून उकळता लाव्हा फुसांडत यावा, त्याचप्रमाणे शतकानुशतकाच्या घोर अन्यायाच्या चिडीतून कडवट अनुभवाचा पीळ भरलेले कठीण शब्दांचे गोफणगोटे हाणाहाण करण्यासाठी उफाळून बाहेर पडलेले दिसतात. त्यांची गद्यशैली उघडी वाघडी वाटली तरी ती खास त्यांचीच आहे. तिला नागरतेची, प्रौढपणाची वा औपचारिकपणाची पदडपोसी ठाऊक नाही. ती रांगडी, चढाईखोर आणि विलक्षण बोलघेवडी आहे."६ म. फुले यांच्या शैलीसंबंधी लिहिताना, "ती विवेकनिष्ठेतून जन्मलेली असल्याचा व तीतून भाषेला कृतीशील करण्याचा प्रयत्न दिसतो असे भालचंद्र नेमाडे यांना वाटते."७

नागनाथ कोत्तापले म्हणतात, म. "फुले यांचे नाव देत पुढे ब्राम्हण ब्राम्हणेत्तर वाद फोफावला परंतु म. फुलेंना हे अपेक्षित नव्हते. त्यांच्या साहित्यात एकदाच ब्राम्हणेत्तर हा शब्द येतो."८

एकंदरीत महात्मा जोतीराव फुले यांचे साहित्य सामाजिक समता, शिक्षण, शेतकरी कल्याण आणि स्त्री-मुक्ती यांसाठी लढणारे प्रभावी विचारमंथन आहे. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे तत्कालीन जातीय शोषण, ब्राह्मणी धर्मव्यवस्था आणि अंधश्रद्धांचा पर्दाफाश केला. गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड, तृतीय रत्न, ब्राह्मणांचे कसब, अखंड, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा आणि सार्वजनिक सत्यधर्म यांसारख्या ग्रंथांमधून त्यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकांना जागृत केले.

फुले यांच्या साहित्याचा मुख्य उद्देश हा बहुजन समाजाला शिक्षण आणि न्याय मिळवून देणे हा होता. त्यांनी स्त्री-शिक्षणाचा प्रचार केला, सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि शेतकरी व श्रमिक वर्गाच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांचे विचार केवळ तत्कालीन समाजापुरते मर्यादित राहिले नाहीत, तर आजही ते सामाजिक समतेच्या चळवळींना प्रेरणा देत आहेत. त्यांच्या साहित्यामुळे भारतीय समाजात परिवर्तनाची नांदी झाली आणि पुढील सामाजिक सुधारणांच्या मार्गावर मोठा प्रभाव पडला. त्यामुळे महात्मा फुले यांचे साहित्य हा केवळ ऐतिहासिक दस्तऐवजच नाही तर आजही ते समाजासाठी मार्गदर्शक आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१. डॉ. सदानंद मोरे, वैचारिक जडणघडण हरि नरके संपादित 'म. फुले : शोधाच्या नव्या वाटा', महाराष्ट्र शासन प्रकाशन, पुणे. प्र.आ., १९९८.
२. डॉ. प्रल्हाद लुलेकर, बहुजन संस्कृतीचे जनक महात्मा फुले, अक्षरवांग्मय प्रकाशन,पुणे. २०१९
३. म. फुले गौरव ग्रंथ : महाराष्ट्र शासन प्रकाशन, १९८२, पृ. ५५१
४. आ. ह. साळुंखे : हरि नरके संपादित 'म. फुले संशोधनाच्या नव्या दिशा, पृ.८२
५. य. दि. फडके, संपादित 'म. फुले समग्रवाङ्मय',१९९१
६. स. गं. मालशे, महाराष्ट्र शासन प्रकाशित 'म. फुले गौरव ग्रंथ', १९८२, पृ. ६६७-
७. तत्रैव १९८२, पृ ७०५.
८. नागनाथ कोत्तापल्ले, जोतीपर्व, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०००